

संस्कृत साहित्य सरिता

दशकुमारचरित भाग १

संस्कृत
साहित्य
सरिता
: १०

दण्डी-कृत

दशकुमारचरित

भाग पहिला

कथासार
अमरेन्द्र

वोरा अँन्ड कंपनी, पब्लिशर्स (प्रायव्हेट) लि०

प्रकाशक :
एम्. के. वोरा
वोरा अँन्ड कंपनी,
पब्लिशर्स (प्रायव्हेट) लि०
३ राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता, मुंबई २

किंमत सहा आणे
पहिली आवृत्ती : १९५६

मुद्रक :
अनंत चिंतामण रायरीकर
'स्वस्तिक मुद्रणालय'
४३९ शनवार पेठ, पुणें २

संस्कृत-साहित्य-सरिता

विशाल महासागराला असंख्य नद्या येऊन मिळत असतात. अशा अगणित नद्यांनींच अमर्याद सागर बनलेला असतो. संस्कृत साहित्याचा महासागरहि असाच अनेक सरितांनीं समृद्ध झालेला आहे. ‘ संस्कृत-साहित्य-सरिता ’ असें नांव दिलेल्या या वाङ्मयमालेंतून आपली आदिभाषा जी संस्कृत तिच्यांतील उत्तम उत्तम वाङ्मयाचा कथारूपानें थोडक्यांत परिचय करून देण्याचें आम्ही योजिलें आहे. संस्कृत वाचणारे थोडे आणि समजणारे तर त्याहून कमी. तेव्हां आजच्या सर्वसामान्य माणसाला, लिहितां-वाचतां येऊं लागलेल्या नवशिक्षितालाहि या संस्कृत-वाणीचा आस्वाद कसा घेतां येणार ? परंतु त्यांना तो मिळणें तर आवश्यक आहे; कारण संस्कृत भाषेंतील वाङ्मय हा आपला फार थोर वारसा आहे. तो गमावणें म्हणजे सर्वस्वच गमावून बसणें. यासाठींच संस्कृत भाषेंतील थोर, प्रसिद्ध अशा वाङ्मयकृतींचें, नाटकांचें आणि काव्यांचें, कथासार आम्ही वाचकांपुढें सादर करीत आहोंत.

आम्ही असें समजतों कीं, देवभाषेंतील या वाङ्मयीन कलाकृतींचा परिचय करून देण्याची आमची ही योजना एक चांगली योजना आहे—एक सत्संकल्प आहे. आणि असे सत्संकल्प उत्तम रीतीनें तडीला नेण्याचें काम जनताजनार्दनाचेंच आहे. तें तसें घडो, हीच इच्छा.

—प्रकाशक

प रि च य

जुन्या संस्कृत साहित्यांत गद्य फारच थोडें आहे. त्यांत नांव घेण्यासारखें ग्रंथ तीनच. बाणभट्टाचे 'कादम्बरी' व 'हर्षचरित' आणि दण्डीचा 'दशकुमारचरित'.

दण्डीचें नांव ' काव्यादर्श ' या त्याच्या साहित्य शास्त्रावरील ग्रंथामुळेंहि प्रसिद्ध आहे; तथापि विशेषत: 'कवि' म्हणूनच तो रसिकांकडून ओळखला जातो. प्रत्यक्ष सरस्वतीनेंहि त्याच्या कवित्वाची प्रशंसा केल्याची दंतकथा प्रचलित आहे. याचा काल कालिदासानंतर कांहीं शतकांचा असला तरी याचें स्थान मात्र कालिदास कविमालिकेंतीलच गणलें जातें. दण्डीचा काल इ. स. पांचव्यापासून सातव्या शतकापर्यंत ताणला जातो.

' दशकुमारचरित ' म्हणून आज जो ग्रंथ उपलब्ध आहे तो सर्वच्या सर्व दण्डीचा नव्हे; त्यांतील पूर्व व उत्तरपीठिका हा भाग दुसऱ्या कोणी लिहिला असावा असें मानतात. तसें म्हणण्यासारखा पुरावा प्रत्यक्ष त्यांतील लेखनशैलीवरूनहि मिळूं शकतो. 'दशकुमारचरितां'त सात उच्छ्वास आहेत त्यांत सात कुमारांच्या कथा आहेत; आणि हाच भाग स्वत: दण्डीनें लिहिला असला पाहिजे हें मान्य झालेलें मत आहे. या ग्रंथांत तत्कालीन समाजाचें स्वच्छ प्रतिबिंब पाहावयास मिळतें. प्रणयापासून रणापर्यंत सर्व कांहीं या कथांतून आलेलें आहे. व्यवहार-वादाचें सडेतोड चित्र म्हणूनहि तें अभ्यसनीय आहे.

—लेखक

दशकुमारचरित

भाग पहिला

मगध देशांत पुष्पपूर नांवाचें एक भरभराटलेलें शहर होतें. मगधाचा राजा राजहंस याची ही राजधानी. राजा यज्ञयागादि करणारा व मोठा धार्मिक होता.तो दिसण्यांतहि अतिशय देखणा असून त्याची राणीहि फार सुंदर होती. राणीचें नांव होतें वसुमती. मगधांतील लोक मोठे पराक्रमी होते, साहसी होते आणि रसिकहि होते. राजहंसाचे तीन मंत्री होते तेहि मोठे बुद्धिमान व मुत्सद्दी. अर्थातच यामुळें राजहंस राजाची कीर्ति सर्वत्र पसरलेली होती.

राजाला मुलगा नव्हता; पण त्याच्या मंत्र्यांना अनेक मुलगे होते. सितवर्मा म्हणून राजाचा जो मंत्री होता त्याच्या दोन मुलांचें नांव होतें सुमति आणि सत्यवर्मा. पद्मोद्भव या दुसऱ्या मंत्र्यालाहि दोन मुलगे होते. त्यांचीं नांवें सुश्रुत व रत्नोद्भव. धर्मपाल या तिसऱ्या मंत्र्याला तीन मुलगे होते. त्यांचीं नांवें होतीं सुमंत्र, सुमित्र आणि कामपाल.

मंत्र्यांच्या या सात मुलांपैकीं सत्यवर्मा हा धार्मिक वृत्तीचा होता. त्यामुळें तो लहानपणींच असार संसार सोडून तीर्थयात्रेला निघून गेला. कामपालाला वाईट संगत लागलीं आणि तो बिघडला. कलावंतिणी व नाटकी मित्र यांच्या मेळ्यांत तो नेहमीं असायचा. हाहि पुढें घरच्या कोणाचें न ऐकतां जगभर भटकन्ती करण्यासाठीं चालता झाला. तिसऱ्या रत्नोद्भवानेंहि मगध सोडलें, परंतु तें

व्यापाराच्या उद्देशानें. कारण त्याला व्यापाराची फार आवड असे. तो समुद्र ओलांडून कोठें तरी देशान्तराला गेला.

हे तिघे परागंदा झाले तरी मागें राहिलेले मंत्र्यांचे चार मुलगे मात्र लायक निघाले. आपापल्या वडिलांच्या मागें तेच मंत्रीपद सांभाळूं लागले.

मगधापासून जवळच माळव्याचें मोठें राज्य होतें. तेथील राजा मानसार हाहि मोठा मान्यता पावलेला होता. त्याच्याजवळ सैन्यहि मोठें होतें. एकदा राजहंस राजाच्या मनांत आलें कीं माळव्याचें राज्य आपल्या छत्राखालीं आणावें. राजहंसानें खूप मोठें सैन्य बरोबर घेऊन एकदम माळव्याच्या राजावर चाल केली. त्याच्यापाशीं चतुरंग सेना होती. तिच्या बळावर राजहंसानें मानसाराचा पुरा बीमोड केला. मानसाराच्या सैन्याची अगदीं ससेहोलपट होऊन तो स्वतः पकडला गेला. परंतु राजहंसानें आपल्या दिलदार स्वभावाप्रमाणें त्याला मुक्त करून पुन्हां त्याच्या गादीवर बसविलें. परंतु त्याच्या या उदारपणाचा उलटाच परिणाम झाला.

मानसाराच्या मानी मनाला पराभवाचें शल्य बोचत होतें. त्यानें राजहंसाचा सूड उगविण्याचा निश्चय केला. त्यासाठीं तो शंकराची कडक उपासना करूं लागला. शंकरानें प्रसन्न होऊन त्याला एक अजिंक्य गदा दिली. त्याबरोबर त्यानें राजहंसावर स्वारी करण्याचा बेत पक्का करून टाकला. राजहंसालाहि ही बातमी त्याच्या गुप्तहेराकडून लागलीच होती. त्यानेंहि मानसाराला तोंड देण्याची तयारी केली. मंत्र्यांनीं मात्र त्याला मानसाराशीं लढाई

न करण्याचा सल्ला दिला होता. शंकराकडून मानसाराला मिळालेल्या अजिक्य गदेची हकीकत त्यांना कळलेली असल्यामुळें ते गडबडून गेले होते. त्यांच्या मतानें प्रत्यक्ष शंकरच युद्धाला येत होता. तेव्हां किल्ल्यांत राहून आपला बचाव करण्याचा सल्ला राजाला त्यांनीं दिला. परंतु शूर राजहंसाला तो मुळींच मानवला नाहीं.

मानसाराशीं लढाई देण्याच्या तयारीनें राजहंस समरांगणांत उतरला. उभय पक्षांकडील सैन्यें एकमेकांशीं भिडलीं आणि युद्ध इतकें भयंकर पेटलें कीं देवांनासुद्धां त्याचें आश्चर्य वाटलें. राजहंस शूर होता. पराक्रमांत त्याची तुलना इंद्राशीं करीत. तथापि मानसारानें मोका साधला आणि आपल्या त्या गाजलेल्या गदेचा तडाखा राजहंसाला दिला. राजहंसाच्या बाणांनीं त्या गदेचे तुकडे तुकडे करून टाकले. तरीपण तो स्वत: त्या गदाप्रहारानें घायाळ झालाच. त्याचा सारथीहि त्या गदेलाच बळी पडला. अर्थातच लगाम सुटलेले घोडे उधळले आणि रथ घेऊन विंध्यारण्याकडे पळत सुटले.

लढाई सुरू होण्यापूर्वींच मंत्र्यांनीं एक व्यवस्था केली होती. लढाईंत कांहीं बरें वाईट झाल्यास राणीच्या जिवाला तरी अपाय होऊं नये अशी त्यांची इच्छा होती. कारण राणी गरोदर होती. तिनें चालविलेल्या विष्णुभक्तीमुळें तिच्या पोटांत मगधाचा राजवंश वाढत होता. त्यामुळें राजाची कशीबशी संमति मिळवून मंत्र्यांनीं वसुमती राणीला निवडक सैन्य बरोबर देऊन विंध्यारण्यांत अगोदरच रवाना केलें होतें.

राजा घायाळ होऊन कोठें नाहींसा झाला याचा पत्ता नाहीं. जवळ जवळ सारें सैन्य गारद झालेलें. शत्रूनें राजधानीवर कबजा केलेला. अशा परिस्थितींत स्वामिभक्त मंत्र्यांनीं लढाईची पराकाष्ठा केली. पण अखेर नाइलाज होऊन तेहि रणांतून निघाले. निघाले ते थेट महाराणीपाशीं येऊन पोहोंचले. महाराणी वसुमतीला पराभवाची हकीकत कळून फार दुःख झालें. तिचा पति–राजा राजहंसहि या धुमाळींत मरण पावला असावा अशीच तिची समजूत झाली. ती सती जावयास तयार झाली. परंतु मंत्र्यांनीं तिला अडविलें. राजा जिवंत असण्याचाहि संभव होता, आणि दुसरें म्हणजे महाराणीच्या पोटांत मगधाच्या राजघराण्याचा अंकुर वाढत होता. तिच्या पोटीं सार्वभौम राजा जन्माला येणार अशी भविष्यवाणीहि झालेली होती. या सर्व गोष्टी सांगून मंत्र्यांनीं तिला सती जाण्यापासून थोपवून धरलें.

मंत्र्यांना वाटलें राणीची समजूत पटली आहे, म्हणून ते तिच्याबाबतींत निर्धास्त राहिले. परंतु राणीला दुःख अनावर झालें होतें. रात्रीं सगळीकडे सामसूम झाल्यावर सैन्याचा तळ ओलांडून ती दूर अरण्यांत गेली. एका झाडाच्या फांदीला आपल्या शालूचा फांस बांधून आत्महत्त्या करण्याचा तिचा विचार होता. अखेर तिनें मरण्याची तयारी केली आणि शेवटची म्हणून आपल्या पतीला हांक मारली–" महाराज, पुढल्या जन्मींहि या अभागिनीला आपलीच पत्नी होण्याचें भाग्य लाभूं दे." परंतु रडत रडत उच्चारलेल्या त्या शब्दांमुळें मोठेंच काम झालें.

राजा राजहंसाचे घोडे रणांगणावरून जे उधळले ते रथ घेऊन थेट विंध्यारण्यांतच घुसले होते. राजा जखमांनीं बेशुद्ध होऊन रथांतच पडला होता. बराच वेळ धांवल्यामुळें घोडेहि दमून एके ठिकाणीं थांबले होते. योगायोगानें शोक अनावर होऊन राणी ज्या ठिकाणीं फांस लावून घेत होती ती जागा रथापासून जवळच होती. अरण्यांतील शांतता आणि रात्रींचा थंड वारा यामुळें राजाहि हळुहळु सावध झाला होता. राणीचे शब्द त्याच्या कानीं पडतांच तो दचकला व त्यानें क्षीण स्वरांत तिला हांक मारली. " देवी ! " त्या निस्तब्ध अरण्यांत ती हांक ऐकूं येतांच राणीहि भानावर आली. चांदणें टिपूर पटलें होतें. त्यामुळें जरा इकडे तिकडे बघतांच वसुमतीला राजाचा रथ दिसला. तिला आपल्या पतीची ओळख पटली. त्यामुळें झालेल्या हर्षानें प्रथम तिच्या तोंडून शब्दहि फुटेना. मग तिनें मोठमोठ्या हांका मारून मंत्र्यांना बोलावलें. सर्वजण राजापाशीं जमले. सर्वांना आनंद झाला.

पण राजाचें पराभवाचें दुःख मात्र कमी होईना. राणीनें त्याला खूप समजावलें. ती म्हणाली, " हा सगळा नशिबाचा खेळ आहे. राम, हरिश्चंद्रासारखेसुद्धां यांतून सुटले नाहींत, मग आपली काय कथा ! पण ते जसे शेवटीं सुखी झाले तसे आपणहि होऊं ही खात्री बाळगा. मात्र तोंवर इथेच दिवस काढायला हवेत. " राणी बरोबर सांगत होती; पण तरी राजाचें समाधान होईना.त्याच्या मनांत येऊं लागलें, ' मानसारानें शंकर प्रसन्न करून घेतले आणि जय मिळविला. आपण तशीच उपासना करून दैवी शक्ति

मिळवूं.' लगेच तो उठून त्याच वनांत राहात असलेल्या वामदेवांच्या आश्रमांत गेला. वामदेवांना नमस्कार करून त्यानें आपल्या मनांतला विचार सांगितला. पण वामदेव म्हणाले, "थोडा धीर धर. राणीच्या पोटीं पुत्र जन्माला येईल तोच शत्रूला नामोहरम करील. तिनें पुष्कळ भक्ति केली आहे."

वामदेवांच्या सांगण्याप्रमाणें वसुमतीला मुलगा झाला. त्याचीं सर्व लक्षणें मोठीं शुभ होतीं. तेव्हां वामदेवांचें उरलेलें भविष्यहि खरें होईल असें वाटूं लागलें. त्या सुंदर मुलाचें नांव ठेवलें राजवाहन. राजवाहनाला आणखीहि सवंगडी त्या अरण्यांत खेळायला मिळाले. चारी मंत्र्यांना मुलगे झाले. सुमतीचा प्रमति, सुमंत्राचा मित्रगुप्त, सुमित्राचा मंत्रगुप्त आणि सुश्रुताचा विश्रुत. हे चारहि बाळ राजवाहनाबरोबर वाढूं लागले. हंसूं खेळूं लागले. आपल्या आई-बापांना आनंदवूं लागले. आपल्या बाळलीलांनीं त्या वनांतच स्वर्ग बनवूं लागले. आणि लवकरच मोठ्या अद्भुत रीतीनें त्यांत आणखी पांच जणांची भर पडली.

एकदां एक तापसी राजहंसाकडे आला. त्याच्यापाशीं एक सुंदर सुकुमार मूल होतें. तापसानें सांगितलें कीं, मी एकदां दर्भ व समिधा आणण्यासाठीं वनांत गेलों असतां तेथें एक गरीब बिचारी बाई बसलेली दिसली. ती दुःखीकष्टी दिसत होती, म्हणून तिची विचारपूस केली तेव्हां

कळलें कीं, मिथिलेचे महाराज प्रहारवर्मा यांचेकडील ती एक दाई होती. तिनें सांगितलें कीं, ' प्रहारवर्मा महाराज, राजहंस व मानसार यांची जी लढाई झाली तींत राजहंस राजाच्या बाजूनें लढत होते. परंतु शेवटीं पराभव होऊन त्यांना माघार घ्यावी लागली. तेथून परत जातांना प्रहार-वर्मा महाराजांवर वाटेंत एका भिल्ल राजानें हल्ला करून त्यांचें सर्वस्व लुटलें. प्रहारवर्मा महाराज निसटून गेले; परंतु तेथून जाण्यापूर्वीं त्यांनीं आपलीं बायका-मुलें पुढें सुरक्षित जागीं पाठवून दिलीं होतीं. त्या लढाईंत पराभव होऊन महाराज पळून चाललेले पाहून आम्ही मंडळीहि पळूं लागलों. महाराजांच्या दोन जुळ्या मुलां-पैकीं एक माझ्या स्वतःच्या हातांत होता आणि दुसरा माझ्या मुलीपाशीं होता. मुलगी त्या धांवपळींत कोठें नाहींशी झाली कांहीं समजलें नाहीं; परंतु मी मात्र एका भयंकर वाघाच्या तावडींत सांपडलें. वाघाच्या भीतीनें मुलासकट मी अडखळून खालीं पडलें. पडतां पडतां हातां-तलें मूल दूर जाऊन एका मेलेल्या गाईच्या पोटावर पडलें. इकडे वाघ माझ्यावर चालून आला पण एका भिल्लाच्या बाणानें तो ठार झाला. त्या मुलाला तो भिल्ल आपल्या-बरोबर घेऊन गेला आणि मी राजाच्या तपासासाठीं हिंडूं लागलें. राजकुमारांचें पुढें काय झालें तें मात्र मला कांहींच कळलें नाहीं. ' हीं त्या बाईची हकीकत ऐकून तीं आपल्या मित्राचीं मुलें म्हणून मी त्यांच्या शोधाला लागलों. त्यांत हा मुलगा मला भिल्लांच्या हातीं सांपडला. याचा आपण सांभाळ करा.

राजानें या बालकाचें नांव उपहारवर्मा असें ठेवलें. त्याची तो आपल्या मुलाप्रमाणें काळजी घेऊं लागला.

पुढें कांहीं दिवसांनीं राजहंस स्नानासाठीं नदीकडे जात असतांना त्याला एका भिल्लिणीपाशीं एक कोमल बालक दिसलें. कोणा गर्भश्रीमंताचें तें मूल असावें असें सहज लक्षांत येत होतें. त्यामुळें राजानें कुतुहलानें त्या बाईपाशीं तें मूल कसें आलें याची चौकशी केली. तेव्हां त्याला असें कळून आलें कीं, त्याचा स्नेही प्रहारवर्मा याचाच हा दुसरा मुलगा. भिल्ल राजानें प्रहारवर्म्याचा पराभव केल्यानंतर जी पळापळ झाली त्यांत हा राजकुमार एका भिल्लाच्या हातीं लागला होता. राजानें त्याला आपल्यापाशीं आणवून त्याचें नांव ठेवलें अपहारवर्मा.

त्यानंतर लवकरच आणखी एक सुंदर बालक राजाकडे आणण्यांत आलें. वामदेव ऋषींचा शिष्य सोमदेव याला एका घनदाट अरण्यांत मोठ्या विचित्र तऱ्हेनें तें सांपडलें होतें. कालयवन बेटांत कालगुप्त नांवाचा धनाढ्य व्यापारी राहात असे. मगधाच्या मंत्र्यांच्या मुलांपैकीं रत्नोद्भव यानें कालगुप्ताची मुलगी सुवृत्ता हिच्याशीं लग्न केलें होतें. कालगुप्त आपल्या गरोदर बायकोला घेऊन भावाला भेटण्यासाठीं पुष्पपूरला यावयाला निघाला. वाटेंत त्याचें जहाज फुटलें. सुवृत्तेबरोबर तिची एक दायी होती. त्या दोघींच्या हातीं एक फळी लागली त्यामुळें त्या बचावून किनाऱ्याला लागल्या. रत्नोद्भवाचें काय झालें तें समजलें नाहीं..ती दायी आणि सुवृत्ता हळुहळु अरण्यांतून वाट काढीत चालल्या होत्या. परंतु मधेंच सुवृत्ता बाळंत होऊन

तिला मुलगा झाला. त्या मुलाला घेऊन जवळपास कोठें वस्ती दिसते का म्हणून ती दायी पाहात होती. इतक्यांत एक रानटी हत्ती तिच्या अंगावर धांवून आल्यामुळें ती त्या मुलाला तसाच टाकून कोठेंतरी पळून गेली. हत्तीनें मुलाला सोंडेंत धरून उचललें. इतक्यांत एका सिंहानें त्याच्यावर झेप टाकली. त्यामुळें तें मूल अंतराळांत भिरकावलें गेलें. परंतु जवळच्या झाडावर बसलेल्या एका माकडानें त्याला वरच्यावर अलगद झेललें. त्याला वाटलें तें एकादें फळबीळ असेल. पण मग त्यानें त्या मुलाला झाडाच्या बेचकांत ठेवून दिलें. तेथूनच तें सुंदर मूल सोमदेवानें आणलें व गुरूंच्या सांगण्यावरून राजाच्या स्वाधीन केलें. राजानें तो मुलगा रत्नोद्भवाचा आहे, हें कळल्यामुळें साहजिकच त्याला त्याच्या काकापाशीं म्हणजे सुश्रुतापाशीं दिलें. त्याचें नांव राजानें पुष्पोद्भव असें ठेवलें होतें.

राणी वसुमतीलाहि असाच एक मुलगा मिळाला. राणी रात्रीं झोपली असतांना एक तेजस्वी स्त्री तिच्याजवळ आली. तिनें एक बालक तिच्या हातीं दिलें. त्या बालकाचें रूप अतिशयच सुंदर होतें. ती एक यक्षाची मुलगी होती. तिचें नांव होतें तारावली. ही मगधाच्या एका मंत्र्याचा मुलगा कामपाल याची बायको होती. आणि तिनें बरोबर आणलेला मुलगाहि तिचाच मुलगा होता. परंतु कुबेराच्या आज्ञेवरून तिनें त्याला राणीपाशीं दिलें होतें. तिनें सांगितलें कीं, ' राजवाहन पुढें सार्वभौम राजा होणार आहे. त्याच्या सेवेसाठीं म्हणून कुबेरानें या मुलाची योजना केली आहे. तेव्हां तूं याचा प्रतिपाळ कर. ' राणीनें

जेव्हां तें अति सुंदर बालक राजापाशीं आणलें तेव्हां त्याला मोठें आश्चर्य वाटलें. त्या मुलाचें नांव ठेवलें अर्थपाल. त्याला त्याच्या चुलत्यांच्या म्हणजे सुमित्राच्या हातीं सोंपविण्यांत आलें.

तिसऱ्या मंत्र्याच्याहि मुलाचा मुलगा राजापाशीं असाच मोठ्या दैवयोगानें आला. वामदेवांच्या एका शिष्याला तो कावेरी नदीच्या कांठीं सांपडला होता. तेथें नदीकांठीं एक बाई रडत बसली होती. तिच्या मांडीवर एक मूल होतें. तिची विचारपूस केली तेव्हां कळलें कीं तो सत्यवर्म्याचा मुलगा. राजहंसाच्या एका मंत्र्याचा मुलगा सत्यवर्मा लहानपणींच तीर्थयात्रेला गेला होता. त्यानें अग्रहार नांवाच्या गांवीं एका ब्राह्मणाच्या मुलीशीं लग्न केलें. तिचें नांव होतें काली. कालीला बरेच दिवस झाले तरी मूल होईना, म्हणून सत्यवर्म्यानें कालीचीच बहीण गौरी म्हणून होती तिच्याशीं दुसरें लग्न केलें. गौरीला मुलगा झाला पण तो कालीच्या डोळ्यांत सलूं लागला. एक दिवस कालीनें त्या मुलाला घेऊन त्याची दायी नदीकांठीं उभी असतां त्या दोघांनाहि नदींत ढकलून दिलें. दायी मुलाला घेऊन पोहत असतां तिला एका वाहत्या झाडाचा आधार मिळाला. दुर्दैवानें त्या झाडाच्या फांदीवर एक साप होता. तो दायीला चावला. परंतु तेवढ्यांत तें झाड जमिनीला लागल्यानें मुलगा बचावला व दायी सर्पविषाला बळी पडली. वामदेवांच्या शिष्यानें सत्यवर्म्याचा शोध घेण्याचा बराच प्रयत्न केला. परंतु त्यांत यश न आल्यानें अखेर त्यानें तो मुलगा आणून राजापाशीं दिला. सत्यवर्म्याच्या

मुलाची ती हकीकत ऐकून राजाला वाईट वाटलें. त्यानें त्या नव्या मुलाचें नांव सोमदत्त असें ठेवलें आणि त्याला सत्यवर्म्याच्या भावाकडे–सुमतीकडे पोहोंचविलें.

आतां विंध्यारण्यांतील राजाच्या त्या निवासांत दहा सुंदर कुमार एकत्र झाले. राजानें त्या दाही कुमारांची पालन-पोषण आणि वर्धन-शिक्षण या बाबतींत उत्तम काळजी घेतली. त्यांच्या मुंजी झाल्यावर त्यांना सर्व प्रकारच्या विद्या शिकविण्यांत आल्या. सर्व विद्या व कला त्या कुमारांना शिकविण्यासाठीं उत्तमोत्तम शिक्षक ठेवलेले होते. लेखन-वाचन, सर्व वेद, सर्व शास्त्रें,इतिहास, काव्य, नाटक, या गोष्टी ते कुमार शिकले. तसेंच राजनीति आणि शस्त्रास्त्र विद्या, वैद्यक व त्याबरोबरच जादूटोणा आणि मंत्रतंत्र यांतहि ते तरबेज झाले. इतकेंच काय चोरीच्या व जुगारीच्या कलेंतलें रहस्यहि त्यांनीं आत्मसात केलें.

ते कुमार हळुहळु तारुण्यांत येऊं लागले. सर्व विद्याकलांनीं संपन्न असे ते दहा तरुण आपल्या भोंवतीं पाहून राजा राजहंसाला साहजिकच मोठा उत्साह वाटूं लागला. त्याच्या मनांत आलें कीं आतां आपल्याला शत्रूची मुळींच भीति नाहीं.

राजा अशा तऱ्हेनें विचार करीत असतांनाच ऋषि वामदेव एक दिवस त्याच्याकडे आले.

एक दिवस राजा दहा कुमारांसह मोठ्या आनंदांत गप्पागोष्टी करीत बसला होता. अशा वेळीं वामदेव ऋषि तेथें आले. राजानें ऋषींचा मनापासून उत्तम आदरसत्कार

केला. कुमारांनींहि वामदेवांना नमस्कार करून त्यांचा आशीर्वाद घेतला. वामदेव त्या कुमारांकडे पाहून राजाला म्हणाले, " राजा, हे शिक्षित, शक्तिमान व सुशील कुमार तुझे मनोरथ निःसंशय पुरे करतील. याकरितां आतां राजवाहनाला आपल्या या कुमार मित्रांसह दिग्विजयाला जाऊं दे. त्यासाठीं हीच योग्य वेळ आहे. सर्व प्रकारचे कष्ट व संकटें यांना तोंड द्यायला ते आतां समर्थ झाले आहेत."

राजाला ऋषींचा हा सल्ला पटला. राजकुमारांची शक्ति-बुद्धि आणि साहस-उत्साह इत्यादि पाहून राजाला खात्री वाटूं लागली कीं, कुमारांच्या या दिग्विजयांतून आपले मनोरथ सिद्धीला जातील. म्हणून त्यानें राजवाहनाबरोबरच्या इतर कुमारांना राजवाहनाचें सचिवपद दिलें; आणि त्यांना चार व्यवहाराच्या गोष्टी सांगून राजानें त्यांची शुभमुहूर्तावर रवानगी करून दिली. दाही कुमार जगाचा अनुभव घेण्यास निघाले.

राजवाहनाला मार्गांत शुभशकून होऊं लागले. हळुहळु ते सर्वजण विंध्यारण्यांत शिरले. अरण्याच्या मध्यावर येतांच त्यांना तेथें एक विचित्र पुरुष दिसला. तो काळाकभिन्न माणूस मोठा भयंकर दिसत होता. त्याच्या शरीरावर जखमांचे अनेक वण होते. परंतु त्याच्या गळ्यांत जानवें असल्यामुळें तो ब्राह्मण असावा अशीहि शंका येत होती. मात्र त्या विचित्र पुरुषानें राजवाहनाचें तेज पाहून त्याचा आदरसत्कार केला. आणि त्यानें विचारल्यावरून आपली ओळखहि करून दिली. तो म्हणाला, " या अरण्यांत पुष्कळ नामधारी ब्राह्मण राहातात. भिल्लांच्या संगतीनें तेहि वृत्तीनें

रानटीच बनले आहेत. वेदाभ्यासाऐवजी चोरी नि दरवडेखोरी हाच त्यांचा व्यवसाय होऊन बसला आहे. अशा एका रानटी ब्राह्मणाचा मी मुलगा आहें. माझें नांव मातंग. मीहि दरवडेखोरच बनलों होतों. पण एकदां एका ब्राह्मणाचा जीव घेत असतांना बरोबरच्या भिल्लांना मीं अडवलें. म्हटलें कीं, या ब्रह्महत्त्येचें पाप नका माथीं घेऊं. पण ते कसचे ऐकतात ! त्यांनीं माझीच हेटाळणी केली. शेवटीं प्रकरण हातघाईवर येऊन त्यांत मी ठार झालों. मृत्यूनंतर रीतीप्रमाणें मला यमापुढें उभें करण्यांत आलें. पण त्यानें दयाळू होऊन चित्रगुप्ताला सांगितलें कीं, 'याची वेळ भरली नव्हती. शिवाय ब्राह्मणाचें रक्षण करण्याच्या कामांत याला मरण आलेलें आहे. याची बुद्धि पालटेल आणि हा पुढें चांगला वागूं लागेल. तेव्हां याला नुसता यमलोक दाखवून परत पाठवा.' त्याप्रमाणें या मृत्युलोकावर परत येऊन मी पुन्हां जिवंत झालों. सुदैवानें एका ब्राह्मणाची गांठ पडून त्यानें मला सन्मार्गाला लावलें. त्याच्याच उपदेशावरून मी शंकराची उपासना करीत असतों."

या मातंगाला शंकरानें आदल्याच रात्रीं प्रसन्न होऊन स्वप्नांत वर दिला होता कीं, तुला पाताळाचें राज्य मिळेल; आणि त्यासाठीं मदत करण्याकरितां एक दोन दिवसांत एक राजपुत्रहि येथें येईल. त्याप्रमाणें राजपुत्र प्रत्यक्ष आलेला पाहून मातंगानें राजवाहनाला एकान्तांत आपल्या स्वप्नाची हकीकत सांगितली आणि आपल्याला साह्य करण्याची विनंति केली. राजवाहनानेंहि साहय देण्याचें कबूल केलें.

मात्र त्या बाबतींत तो आपल्या सोबत्यांशीं कांहीं बोलला नाहीं.

रात्रीं इतर सर्वजण झोंपीं जातांच मातंग आणि राजवाहन दोघेहि तेथून उठून गुप्तपणानें दूर निघून गेले. मातंगाला स्वप्नांत कळलेल्या मार्गाप्रमाणें ते चालत होते. चालतां चालतां ते पाताळांत शिरले, तोंच त्यांना एक मोठें शहर लागलें. त्या शहराजवळ मातंगानें एक यज्ञकुंड तयार केलें आणि आपण स्वतः त्या अग्नींत उडी घेतली. राजवाहनाला तो सर्व प्रकार पाहून मोठें नवल वाटलें. परंतु त्याचें आश्चर्य ओसरण्याच्या आंतच यज्ञकुंडांतून मातंगाचा देह दिव्य रूप धारण करून वर आलेला त्याला दिसला. तेवढ्यांत तेथें एक सुंदर तरुणी येऊन उभी राहिली आणि तिनें एक तेजस्वी हिरा मातंगाच्या हातावर ठेवला. ती हात जोडून त्याला म्हणाली, " हे ब्राह्मणश्रेष्ठा, मी असुर राजकन्या कालिंदी आहें. माझे वडील विष्णूबरोबर झालेल्या युद्धांत मारले गेले त्यामुळें मी अतिशय दुःखी झाल्यें. तेव्हां एका दयाळू सिद्धानें येऊन मला आशीर्वाद दिला कीं, ' मुली दुःख आवर. दिव्यदेहधारी असा एक मानव येथें येईल आणि तोच पाताळलोकाचा राजा होईल. तोच तुझा पति. ' तेव्हां महाराज आतां हें राज्य आणि त्याबरोबरच ही दासी या दोहोंचाहि आपण स्वीकार करा. "

मातंगानेंहि राजवाहनाचा विचार घेऊन कालिंदीच्या म्हणण्याला रुकार दिला. मातंगानें कालिंदीशीं लग्न केलें आणि पाताळाचें राज्य करीत तो तेथेंच राहिला.

राजवाहनाला मात्र आपल्या मित्रांवांचून चैन पडत नसल्यामुळें तो परत यावयाला निघाला. मातंगानें कृतज्ञतापूर्वक त्याचे आभार मानले आणि कालिंदीनें पहिल्या भेटींत दिलेला तो तेजस्वी हिरा राजवाहनाला भेट म्हणून अर्पण केला. त्या हिऱ्यांत अशी शक्ति होती कीं तो ज्याच्यापाशीं असेल त्याला तहान, भूक किंवा कष्ट, त्रास कधीं व्हावयाचा नाहीं. राजवाहनानें त्या हिऱ्याचा स्वीकार केला व गेल्या मार्गानें तो विंध्यारण्यांत परत आला.

परंतु विंध्यारण्यांत पूर्वीच्या जागीं त्याचे मित्र होते कोठें? राजकुमार रातोरात नाहींसा झालेला पाहून ते त्याच्याच शोधासाठीं दाही दिशा पांगले होते. त्यांच्या शोधासाठीं मग स्वतः राजवाहन जग धुंडायला निघाला.

राजवाहन हिंडतां हिंडतां एका शहरापाशीं आला. तेथील क्रीडोद्यानांत लोक हंसत खेळत मौजेनें बसले होते. राजवाहनानें पाहिलें कीं पालखींत बसून एक तरुण जोडपें क्रीडोद्यानांतच येत आहे. त्या पालखीभोंवतीं आप्तेष्टांचा घोळकाहि बराच मोठा दिसत होता. पालखी जवळ येतांच आंतील तरुणानें राजवाहनाला पाहिलें व तो चटकन् पालखींतून खालीं उतरला. त्यानें राजवाहनाचे येऊन पाय धरले. राजवाहनानेंहि मग ओळखलें कीं, हा आपला मित्र सोमदत्त आहे. तेव्हां त्यानें त्याला गाढ आलिंगन दिलें. दोघांनाहि एकमेकांच्या भेटीनें अतिशय आनंद झाला.

साहजिकच सोमदत्ताला राजवाहनानें विचारलें कीं, हें

सर्व ऐश्वर्य तुझ्यापाशीं आलें कसें ? ही तरुणी कोण ? तेव्हां सोमदत्तानें आपली हकीकत राजवाहनाला निवेदन केली.

सोमदत्ताची हकीकत

सोमदत्त सांगू लागला :

तुमचा शोध करीत हिंडतां हिंडतां मला एकदां अतिशय तहान लागली. दिवस उन्हाळ्याचे होते. जवळच एक नदीहि दिसली. पाणी पिण्यासाठीं म्हणून त्या नदीच्या कांठीं आलों तों तेथें एक मौल्यवान हिरा आढळला. नदीच्या थंड पाण्यानें आपली तहान भागवून आणि तो हिरा बरोबर घेऊन मी तसाच पुढें निघालों. परंतु कडक उन्हामुळें पुढें जाणें अशक्य झाल्यानें अखेर एका देवळांत विश्रांतिसाठीं मी थांबलों.

देवळांत पाहातों तों एक ब्राह्मण तेथें दीनवाणा होऊन बसला होता. त्याचें मुलांचें लेंढारहि बरेंच मोठें होतें. त्याच्यापाशीं मीं चवकशी केली तेव्हां मला समजलें कीं मी वीरकेतूच्या राज्यांत आलों आहें. त्या ब्राह्मणाकडून मला आणखी असेंहि समजलें कीं, ‘ मत्तकाल नांवाच्या लाट देशाच्या राजानें वीरकेतूवर नुकतीच स्वारी केली होती व त्यांत विजयी होऊन मत्तकाल परत चालला आहे. या स्वारीचें कारण होतें वीरकेतूची अति सौंदर्यवती मुलगी वामलोचना. मत्तकालानें वामलोचनेसाठीं मागणी घातली परंतु वीरकेतूनें ती झिडकारून टाकली होती. त्यामुळें मत्तकाल वीरकेतूच्या राजधानीवर चालून आला.

राजधानीला वेढा पडलेला पाहातांच वीरकेतू घाबरला व त्यानें निमूटपणें वामलोचना मत्तकालाच्या हवालीं केली. मुलीच्या पाठराखणीसाठीं म्हणून वीरकेतूनें आपला प्रधान मानपाल याचीहि मत्तकालाबरोबर पाठवणी केली. मानपाल एकटा नसून राजाचें चतुरंग सैन्यहि त्याच्याबरोबर दिलेलें आहे. मानपालाच्या अंतःकरणांत राजाच्या अपमानाचें शल्य सारखें डांचत असल्यानें तो मत्तकालावर उलटण्याच्या विचारांत आहे. मत्तकाल वामलोचनेला घेऊन आपल्या देशाला परत जात आहे. सध्यां शिकारीच्या निमित्तानें त्याचा तळ येथें जवळच पडलेला आहे.'

ही माहिती सांगणारा ब्राह्मण मला मोठा विद्वान दिसला. परंतु दुर्दैवानें त्याला दारिद्र्यानें घेरलें होतें. म्हणून सत्पात्र ब्राह्मण पाहून मला नदीकांठीं सांपडलेला तो हिरा मी त्याला देऊन टाकला. ब्राह्मणाला मोठा हर्ष झाला. तो हिरा घेऊन मोठ्या आनंदानें तो कोठेंतरी निघून गेला. मीहि फार थकून गेलों होतों त्यामुळें मग ती रात्र तेथेंच काढण्याचें ठरवून रात्रीं मी देवळांतच झोंपीं गेलों. परंतु सकाळीं पाहातों तों त्या बिचाऱ्या ब्राह्मणाला राजदूतांनीं पकडून तेथें आणलें होतें. ब्राह्मणाच्या पाठीवर चाबकाचे वळ उठलेले दिसत होते. त्यानें समोर येतांच माझ्याकडे बोट करून "हाच तो चोर" असें म्हटलें. त्याबरोबर त्या शिपायांनीं ब्राह्मणाला सोडून देऊन मलाच पकडलें आणि तुरुंगांत नेऊन टाकलें.

मला तेथें समजलें कीं मला पकडणारे हे मत्तकालाचे शिपाई होते; आणि त्यांनीं मला चोरीच्या आरोपावरून

तेथें डांबून टाकलें होतें. तुरुंगांत माझ्या आसपास आणखी अनेक कैदी होते. ते खरे होते मानपालाचे नोकर. मानपालाच्या आज्ञेवरून मत्तकालाला गुप्तपणें ठार मारण्यासाठीं ते त्याच्या शिबिरांत गेले होते. परंतु मत्तकाल तेथें न सांपडल्यामुळें त्यांनीं हातीं लागेल तें जडजवाहीर लुटलें व ते अरण्यांत पळून गेले.मत्तकालाच्या शिपायांनीं पावलांच्या खुणांवरून त्यांचा पाठलाग केला व त्यांना पकडून आणून तुरुंगांत डांबलें. मानपालाच्या या चोरट्यांचाच मी साथीदार असें मत्तकालाचे शिपाई समजले व त्यांनीं मला पकडलें, हें आतां माझ्या ध्यानांत आलें.

मग मी मानपालाच्या या लोकांशीं मैत्री केली. त्यांना माझी सर्व खरी हकीकत सांगितली. रात्रीं संधी साधून आम्ही सर्वचजण तेथून निसटलों आणि थेट मानपालापाशीं येऊन पोहोंचलों. मत्तकालाला हें समजतांच आपल्या तुरुंगांतून पळून गेलेले लोक आपल्या हवालीं करण्याबद्दल त्यानें मानपालाला निरोप पाठवला. परंतु मानपालानें तो धुडकावून लढाईची तयारी केली. मत्तकालापाशीं सैन्य फारसें नव्हतें. तरीपण तो संतापून मानपालावर चालून आला. मीहि मानपालाच्या बाजूनें हिरीरीनें लढलों. आणि अखेर स्वतः मत्तकालाशींच गांठ घालून त्याचा शिरच्छेद केला. वीरकेतूला मत्तकालाच्या पराभवाची ही हकीकत समजतांच अत्यानंद झाला. आणि त्यानें माझा पराक्रम पाहून मला आपला जांवई करून घेतलें. इतकेंच नव्हे तर पुढें त्यानें मला यौवराज्याभिषेकहि करविला.

अशा रीतीनें मी राजाची सेवा करीत आनंदांत काळ

घालवीत होतों. परंतु मला तुमच्या आठवणीनें उदासवाणें होत असे. तेव्हां एका सिद्धपुरुषाच्या सांगण्यावरून आज येथें शंकराची पूजा करण्यासाठीं मी आलों; आणि त्या भक्तवत्सल महादेवाच्याच कृपेनें तुमच्या पायांचें दर्शन झालें.

सोमदत्ताची ती हकीकत ऐकून राजवाहनानें त्याच्या पराक्रमाची वाहवा केली आणि त्याचा कांहीं अपराध नसतांना त्याला जी शिक्षा भोगावी लागली होती त्याबद्दल दैवाला दोष दिला. नंतर स्वतः राजवाहन आपली पाताळ-लोकांतील हकीकत सांगूं लागणार इतक्यांत त्याचा दुसरा मित्र पुष्पोद्भव अचानक तेथें आला व त्यानें राजवाहनाच्या पायांवर डोकें ठेवलें. तिघांच्याहि एकमेकांशीं प्रेमानें भेटी झाल्या. राजवाहनानें आपण सर्व मित्रांना सोडून पाताळांत कां व कसे गेलों तें मग त्यांना सविस्तर सांगितलें. नंतर पुष्पोद्भवाला त्यानें त्याच्या बाबतींत काय काय झालें म्हणून विचारलें.

पुष्पोद्भवाची गोष्ट

पुष्पोद्भव सांगूं लागला :

सकाळीं उठल्यावर तुम्ही जेव्हां कोठें दिसलां नाहींत, तेव्हांच आम्ही समजलों कीं, त्या ब्राह्मणाच्या साह्यासाठीं तुम्ही गेलां आहांत. परंतु नक्की कोणत्या ठिकाणीं गेलांत हें कळायला कांहीं मार्ग नव्हता. त्यामुळें आम्ही तुमच्या शोधासाठीं वेगवेगळ्या दिशांना जायचें ठरविलें.

मीहि एक दिशा ठरवून निघालों. हिंडतां हिंडतां कडक

उन्हामुळें अगदीं थकून जाऊन पर्वताच्या कड्याजवळ वाढलेल्या एका झाडाच्या सांवलीला मी बसलों. तेथें अंमळ टेकतों तोंच मुस्कुंडी झालेली एक मनुष्याकृति सांवली हालतांना माझ्या दृष्टीस पडली. मी कुतूहलानें वर पाहिलें तों कोणीतरी माणूस कड्यावरून खालीं उडी घेतांना दिसला. मीं लगेच पुढें होऊन त्याला वरच्यावर अलगद झेललें. तो माणूस बेशुद्धच झाला होता परंतु थंड उपचारांनीं मीं त्याला लवकरच शुद्धीवर आणला. त्या शोकाकुल माणसाचे डोळे अश्रूंनीं डबडबले होते. 'कां रे बावा, आत्महत्त्या कां करीत होतास?' म्हणून मीं त्याला विचारलें. तेव्हां त्यानें आपली कर्मकहाणी सांगितली, ती अशी: मगध-मंत्री पद्मोद्भव याचा तो मुलगा. त्याचें नांव होतें रत्नोद्भव. कालयवन बेटावर तो व्यापाराच्या निमित्तानें गेला असतांना त्यानें तेथील एका धनाढ्य व्यापाऱ्याच्या मुलीशीं लग्न केलें. कांहीं दिवसांनंतर कालयवनाहून आपल्या बायकोसह स्वदेशीं परत येत असतांना त्या बिचाऱ्याचें जहाज फुटून तो एकटाच कसा-बसा किनाऱ्याला लागला. बायको बुडून मेली अशीच त्याची समजूत होती. परंतु त्याला एक साधु भेटला त्यानें सांगितलें होतें कीं, 'सोळा वर्षांनीं तुझें दुःख दूर होईल.' त्याप्रमाणें सोळा वर्षें पुरीं झाल्यानंतर मात्र त्याला बायकोच्या विरहाचें दुःख अधिक सहन करणें अशक्य झालें आणि त्यानें त्या कड्यावरून आपला देह खालीं झोंकून दिला.

त्याची ही कहाणी सांगून पुरी होते न होते इतक्यांत

एका स्त्रीचा आवाज माझ्या कानावर आला. ‘तुला तुझ्या पतीची व पुत्राची पुन्हा भेट होईल म्हणून सिद्धानें आशीर्वाद दिला असतांनाहि तूं अग्निप्रवेश करत्येस हें बरें नव्हे,’ कोणीतरी स्त्री सांगत होती. मला तो एकंदर प्रकार विचित्र वाटल्यावरून मी त्या आवाजाच्या दिशेनें पळत गेलों. तेथें गेल्यावर असें दिसलें कीं एक म्हातारी दुसऱ्या एका प्रौढेला आत्महत्त्येपासून परावृत्त करीत आहे. आणि अधिक तपास केल्यावर कळलें कीं आत्महत्त्या करूं पाहणारी ती तर प्रत्यक्ष माझी आईच आहे. हेंहि लक्षांत आलें कीं मगाशीं आपण ज्यांना वांचविलें ते आपले वडीलच. तेव्हां लगेच मी आईवडिलांची भेट करवून दिली. आम्हां सर्वांनाच फार आनंद झाला.

राजहंस महाराजांकडील सर्व हकीकत आपल्या वडिलांना मी निवेदन केली. तसेंच तुम्ही अरण्यांतून एकाएकीं कसे नाहींसे झालांत व आम्ही तुमच्या शोधार्थ कसे भटकत आहोंत तेंहि त्यांना मीं सांगितलें.

नंतर आईवडिलांना एका ऋषींच्या आश्रमांत ठेवून मी पुन्हां तुमच्या शोधासाठीं निघालों. विंध्यारण्यांतील एका गांवाजवळ जमिनींत पुरलेलें पुष्कळ धन होतें तें मीं हस्तगत केलें आणि त्याच्या बळावर बाजारांतील चन्द्रपाल नांवाच्या एका व्यापाऱ्याशीं सूत जमविलें. पुढें चन्द्रपाला-बरोबर मी उज्जयिनींत येऊन राहिलों आणि आपल्या आई-वडिलांनाहि मग मीं आपल्यापाशीं आणविलें. चन्द्रपालाचे वडील बन्धुपाल मोठे गुणी गृहस्थ होते. त्यांच्या ओळखीनें माझें माळव्याचा राजा मानसार याच्याकडे जाणें झालें.

आणि त्याच्याच अनुमतीवरून मी तेथें गुप्तपणानें राहूं लागलों. परंतु मला तुमची भेट झाल्याशिवाय चैन पडेना. तेव्हां बन्धुपालानें मला सांगितलें कीं, 'मी तुला योग्य मुहूर्त काढून देईन, तेव्हां तुझ्या राजाच्या शोधासाठीं गेलास म्हणजे तो तुला नक्की भेटेल.'

बन्धुपालाच्या आग्रहावरून उज्जयिनींत राहात असतांनाच बालचन्द्रिका नांवाची एक वैश्यकन्या माझ्या दृष्टीला पडली. ही बालचन्द्रिका मालवराज मानसाराच्या राजकन्येची सखी होती. बालचन्द्रिका हें तिचें नांव खरोखरीच सार्थ होतें. तिचा मुखचंद्र खरोखरीच चन्द्रासारखा सुंदर होता. तिला पाहातांच माझें मन तिच्यावर जडलें. परंतु बालचन्द्रिकेवर दारुवर्मा नांवाच्या राजघराण्यांतील एका पुरुषाचा डोळा होता. मानसारानें म्हातारपणामुळें राज्य आपला मुलगा दर्पसार याच्यावर सोपविलें होतें, परंतु दर्पसार विरक्त होऊन तप करण्यासाठीं निघून गेला. त्याच्यामागें त्याचे जुलमी आतेभाऊ दारुवर्मा व चंडवर्मा यांच्या हातींच राज्याचीं सूत्रें आलीं. त्यांतील दारुवर्म्यानें तर आपल्या दुष्ट स्वभावामुळें प्रजेला जीव नकोसा करून टाकला होता. बालचन्द्रिकेनें डोळ्यांत पाणी आणून ही सर्व हकीकत माझ्या कानावर घातली. तेव्हां बालचन्द्रिकेला मी एक युक्ति सुचविली.

थोड्याच दिवसांत शहरांत अशी अफवा उठली कीं, बालचन्द्रिकेच्या अंगावर एक यक्ष राहातो. जो त्या यक्षाला जिंकील त्यालाच बालचन्द्रिकेशीं लग्न लावतां येईल. ही अफवा माझ्याच सांगण्यावरून उठविण्यांत आली होती.

यामुळें दारुवर्मा एक तर भिऊन बालचन्द्रिकेचा पिच्छा सोडील किंवा त्या यक्षाशीं सामना करण्याचा तरी प्रयत्न करील, हें उघड होतें. त्याप्रमाणें दारुवर्म्यानें एका रात्रीं बालचन्द्रिकेला एकान्तात बोलाविलें. बालचन्द्रिका त्याप्रमाणें आलीहि; परंतु मीहि तिच्याबरोबर दासीच्या वेषांत गुप्तपणें गेलों. वेळ रात्रींची होती. एकान्तात येतांच मीं दारुवर्म्याशीं द्वंद्व खेळून त्याला ठार केलें. आणि तेथून गुपचुपपणें निसटलों. लोकांना वाटलें कीं यक्षानेंच दारुवर्म्याला मारलें; आणि त्याला योग्य प्रायश्चित्त मिळालें म्हणून त्यांना आनंदहि झाला. पुढें आमचा दोघांचा विवाह झाला आणि आम्ही दोघें आनंदांत राहूं लागलों.

बन्धुपालानें अगोदरच भविष्य वर्तविलें होतें कीं, तीस दिवसांत तुमची राजवाहनाशीं भेट होईल. त्याप्रमाणें मी तिसाव्या दिवशीं आपल्या शोधासाठीं बाहेर पडलों आणि नगराजवळील उद्यानांतच आपली अचानक गांठ पडली.

पुष्पोद्भवाची ही हकीकत सांगून झाल्यावर राजवाहनानें सोमदत्ताचा व आपला स्वतःचाहि वृत्तान्त पुष्पोद्भवाला सांगितला. सोमदत्त संकल्पाप्रमाणें शिवपूजेसाठीं निघून गेल्यावर पुष्पोद्भव राजवाहनाला घेऊन अवन्तिकेंत आला. राजवाहनाची खरी ओळख बन्धुपाल इत्यादि आपल्या इष्टमित्रांना त्यानें करून दिली. शहरांत मात्र 'हा एक मोठा शास्त्रसंपन्न ब्राह्मण आहे' असें त्यानें राजवाहनाबद्दल पसरवून दिलें.

लवकरच वसंत ऋतु आला. उज्जयिनी नगरीला नवीनच शोभा प्राप्त झाली. मदनोत्सवासाठीं मानसाराची मुलगी राजकुमारी अवन्तिसुंदरी आपल्या सख्यांसह उद्यानांत आली. तिच्याबरोबर तिची आवडती मैत्रीण बालचन्द्रिका होतीच. पुष्पोद्भवहि राजवाहनाला घेऊन उद्यानांत फिरण्यासाठीं म्हणून आला. त्यांना पाहातांच बालचन्द्रिकेनें राजवाहनाची अवन्तिसुंदरीशीं ओळख करून दिली. पहिल्या दृष्टिभेटींतच एकमेक एकमेकांवर अनुरक्त झालीं.

इतक्यांत राजवाहनाला आपल्या पूर्वजन्माची आठवण झाली. पूर्वजन्मांत अवन्तिसुंदरीच त्याची बायको होती. त्यावेळीं तिचें नांव होतें यज्ञवती आणि हा स्वत: शांब नांवाचा एक राजा होता. त्या दोघांच्या हातून एका ऋषीचा कांहीं अपराध घडल्यामुळें त्यानें शाप दिला होता कीं, पुढल्या जन्मांत तुम्हां दोघांचा वियोग होईल. राजवाहनानें ही हकीकत सांगतांच अवन्तिसुंदरीलाहि पूर्वजन्मींची आपली आठवण झाली. यामुळें तर उभयतांचीं अंत:करणें एकमेकांविषयींच्या प्रेमानें पुरीं जखडूनच गेलीं.

परंतु अवन्ति नगरींत राजवाहन हा एक विद्वान ब्राह्मण म्हणून ओळखला जात होता. या 'ब्राह्मणा'ला राजाची राजकन्या कशी मिळणार ? दोघें एममेकांच्यासाठीं झुरूं लागलीं. तितक्यांत त्यांच्या मदतीला दैवच धांवून आलें. अवन्ति नगरींत नुकत्याच आलेल्या एका जादूगारानें त्याचें काम करून देण्याचें आपल्याकडे घेतलें. जादूगारानें राजवाड्यांत प्रवेश मिळविला आणि त्यानें तेथें राजापुढें आपले विलक्षण प्रयोग दाखविण्यास प्रारंभ केला. त्यानें

खूप साप उत्पन्न केले आणि तसेच लगेच गरूड उत्पन्न करून त्यांच्याकडून ते आकाशांत उचलून नेवविले. राजा-सुद्धां सर्वजण त्याच्या प्रयोगांनीं अगदीं आश्चर्यचकित होऊन गेले. अखेर जादूगारानें आपल्या शेवटच्या प्रयोगाला सुरुवात केली. तो म्हणाला कीं, मी आतां राजकुमारी अवन्तिसुंदरीसारखी दिसणारी एक राजकन्या जादूनें उत्पन्न करतों आणि तिचें एका जादूच्याच राजपुत्राशीं लग्न लावून देतों.

त्याप्रमाणें खरोखरीच राजकन्या व राजपुत्र यांचें तेथेंच लग्न लावण्यांत आलें. सर्व धार्मिक विधि, मंत्रतंत्र नेहमींप्रमाणें झालें. तें जादूचें लग्न पार पडल्यावर जादूगार म्हणाला, " मायावी माणसांनो, तुम्ही आतां परत जा." त्याप्रमाणें राजदरबारांत लग्नासाठीं जमलेलीं सर्व माणसें हळुहळु तेथून निघून गेलीं. राजाला आणि लोकांनाहि वाटलें कीं येथें आलीं आणि परत गेलीं तीं सर्व माणसें जादूचींच होतीं. परंतु वास्तविक तीं सर्व माणसें खरोखरीचींच होतीं. अवन्तिसुंदरी व राजवाहन यांच्या लग्नाला राजा परवानगी देणार नाहीं म्हणून जादूगारानें केलेली ही युक्ती होती. त्या दोघांचें खरेंखुरें लग्न लागलें होतें—लोकांच्या व राजाच्या देखत.

राजवाहन अवन्तिसुंदरीबरोबर तिचा पति म्हणूनच तिच्या महालांत गेला व तेथें राहूं लागला. बाहेर कोणाला ही गोष्ट कित्येक दिवस कळलीच नाहीं. पुढें एके दिवशीं सकाळीं तीं दोघें जागीं झालीं असतां अवन्तिसुंदरीला दिसलें कीं राजवाहनाचे पाय चांदीच्या सांखळीनें जखडून

गेलेले आहेत. तें पाहून ती फार घाबरली व तिनें आरडा-ओरड केली. त्यामुळें अर्थातच बाहेरचे नोकर महालांत धांवून आले. तेथें राजवाहनाला पाहातांच सगळें रहस्य फुटलें. चण्डवर्म्याला ही गोष्ट कळतांच त्यानें राजवाहनाला पकडून कैदेंत टाकलें. परंतु राजा मानसाराला राजवाहना-संबंधींची सर्व माहिती कळून त्याचा आपल्या जांवया-बद्दल चांगला ग्रह झाला होता. त्यामुळें त्यानें मध्यस्थी करून राजवाहनाचा जीव वांचविला; मात्र तुरुंगांतून त्याची सुटका झाली नाहीं. उलट कांहीं दिवसांनीं चण्डवर्मा स्वारींत त्याला कैदी म्हणून आपल्याबरोबर घेऊन गेला.

चण्डवर्म्याची ही स्वारी अंगदेशचा राजा सिंहवर्मा याच्यावर निघाली होती. सिंहवर्म्याची सुंदर मुलगी अंबालिका आपल्याला मिळावी अशी चण्डवर्म्याची इच्छा होती. परंतु सिंहवर्म्यानें त्याची ती मागणी फेटाळून लावली. त्यामुळें अंबालिका बळजबरीनें घेऊन जावी म्हणून चण्डवर्मा सिंहवर्म्यावर चालून आला होता. अंगदेशाची राजधानी चम्पानगरी येथें भयंकर लढाई होऊन शेवटीं सिंहवर्म्याचा पराजय झाला. अंबालिका चण्डवर्म्याच्या हातीं आली व त्यानें तिच्याशीं लग्न करण्यासाठीं मुहूर्तहि निश्चित केला. परंतु तत्पूर्वी बरोबर बंदी म्हणून आणलेल्या राजवाहनाला त्यानें हत्तीच्या पायीं देण्याचें ठरविलें. राजवाहनाच्या पायांत ती चांदीची सांखळी तशीच होती. राजवाहनावर हत्तीला सोडून देतांच इकडे त्याच्या पायांतली ती सांखळी गळून पडली व त्याचे

जखडलेले पाय मोकळे झाले. आणि गळून पडलेली सांखळी एका सुंदर अप्सरेच्या रूपांत राजवाहनासमोर उभीं राहिली. ती म्हणाली कीं, "मी ऋषिशापानें सांखळी बनलें होतें. माझ्या शापाची मुदत आज संपली. आतां तुम्हीहि मोकळे झालांत."

इतकें होत आहे तों कोणीतरी चण्डवर्म्याला ठार मारल्याची ओरड झाली. सर्वत्र गडबड उडाली. राजवाहनानें त्या गडबडीचा फायदा घेतला. त्या मत्त हत्तीवरच तो स्वार झाला आणि राजवाड्याकडे निघाला. त्यानें ओरडून सांगितलें कीं, चण्डवर्म्याला मारणाराच्या बाजूनें मी उभा आहें. तें ऐकून पुढें आलेला माणूस दुसरा तिसरा कोणी नसून राजवाहनाचा मित्र अपहारवर्माच होता. त्याला पाहातांच राजवाहनाला फार आनंद झाला. राजवाहनानें सांगितलें कीं, आपला मित्र धनमित्र सिंहवर्म्याच्या मदतीला मोठें सैन्य घेऊन येत आहे.

त्याप्रमाणें लवकरच येऊन धनमित्रानें चण्डवर्म्याच्या सेनेचा फडशा पाडला. सर्व स्थिरस्थावर झाल्यावर राजवाहन अपहारवर्म्याबरोबर चम्पानगरीबाहेर एके ठिकाणीं आला. तेथें त्यांना धनमित्र आणि तसेच उपहारवर्मा, अर्थपाल, प्रमति, मित्रगुप्त, मंत्रगुप्त आणि विश्रुत असें सर्वजण भेटले. त्याच्याबरोबरच अंगदेशचा राजा सिंहवर्मा आणि मिथिलाधीश प्रहारवर्मा, काशीराजा व कामपाल हेहि तेथें हजर होते. एकमेकांच्या भेटींनीं मोठा आनंदीआनंद झाला.

राजवाहनानें आपली स्वतःची हकीकत त्या नवीन

भेटलेल्या मित्रांना सांगितली. सोमदत्त व पुष्पोद्भव यांचाहि वृत्तान्त त्यांना कथन केला. आणि मग तेथें जमलेल्यांपैकीं प्रत्येकाला आपापली कहाणी निवेदन करायला त्यानें सांगितलें. त्याप्रमाणें प्रथम अपहारवर्म्यानें आपली आत्मकथा सांगावयास प्रारंभ केला.

संस्कृत साहित्य सरितेचीं पुस्तकें

१०

१. रघुवंश
२. शाकुन्तल
३. विक्रमोर्वशीय
४. मृच्छकटिक
५. प्रतिमा
६. महावीरचरित
७. उत्तररामचरित
८. मालतीमाधव
९. स्वप्नवासवदत्ता
१०. दशकुमारचरित : भाग १
११. दशकुमारचरित : भाग २
१२. वेणीसंहार
१३. कुमारसम्भव
१४. मालविकाग्निमित्र
१५. हर्षचरित
१६. नागानंद
१७. पंचरात्र
१८. रत्नावली
१९. कादम्बरी
२०. मेघदूत
२१. शिशुपालवध
२२. किरातार्जुनीय
२३. बुद्धचरित
२४. मुद्राराक्षस
२५. प्रतिज्ञायौगंधरायण
२६. अविमारक
२७. अभिषेक
२८. मध्यमव्यायोग
२९. कर्णकार
३०. उरुभङ्ग
३१. पार्वतीपरिणय
३२. नलोदय

प्रत्येकीं किंमत ६ आणे

६ आणे

वोरा ॲन्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लि०